|| श्री ||

**<u>14 जानेवारी 2006 मकर संक्रांत DVMMM</u>**

मकर संक्रांत! "तीळ गूळ घ्या, गोड गोड बोला" असं म्हणत मैत्रीचं आणि सलोख्याचं नातं घेऊन येणारी संक्रांत! हलवा, गूळपोळी सारखे गोड पदार्थ घेऊन येणारी संक्रांत! 2006 सालच्या संक्रांतीचा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम 14 जानेवारीला हाकीसन इथल्या 'हिन्दू टेंपल' मध्ये DVMMM तर्फे धूमधडाक्यात साजरा झाला. त्याचाच हा अहवाल!

याच दिवशी सूर्याचं दक्षिणायन संपून उत्तरायण चालू होतं. दिवस हळूहळू मोठा होऊ लागतो. सूर्य धनु राशीतून मकर राशीत संक्रमण करतो, म्हणून ही मकर संक्रांत! संक्रांत पौष महिन्यात येते. हा एकमेव हिन्दूंचा असा सण आहे जो इंग्रजी दिनदर्शिका आणि आपलं चांद्रवर्ष, दोन्हीमध्ये एकाच दिवशी येतो. याला अर्थात एक वैज्ञानिक कारणही आहे. ते असं की सूर्याचा मकर राशीत पव्रेश हा जवळपास 365 दिवसांनी होतो आणि इंग्रजी दिनदर्शिका ही 365 दिवसांचीच असते, आणि याचमुळे या तारखा जुळतात. परंतु 14 जानेवारीचा संक्रांतीशी काहीही संबंध नाही असंही काही पंचांगकर्त्यांचं मत आहे. याचं कारण असं की सूर्याचा मकर राशीत प्रवेश तंतोतंत 365 दिवसांशी जुळत नाही, आणि यामुळे अनेक वर्षांनी या वेळांमधला फरक जमा होत होत संक्रांत कदाचित 15 जानेवारीलासुद्धा येऊ शकेल.

संक्रांत ही हिवाळ्यात येत असल्यानं शरीराचा उष्मांक वाढवण्यासाठी तीळ आणि गूळ अशा उष्मादेयक पदार्थांची देवाणघेवाण मोठ्या प्रमाणात चालते, आणि याच वेळेला "तीळ गूळ घ्या, गोड गोड बोला" अशा शुभेच्छा एकमेकांना दिल्या जातात. तीळ हे व्यक्तिचं तर गूळ हे मैत्रीचं प्रतिक मानलं जातं. आपसातली भांडणं आणि वैर विसरून परत जवळ यायची ही खूप मोठी संधी असते.

या दिवशी सर्व विवाहीत स्त्रीया एकत्र जमून हळदी कुंकू साजरं करतात. तसंच या दिवशी काळे कपडे घातले जातात कारण ते उष्णता शोषून घेतात.

संक्रांतीच्या या थोड्याशा माहितीनंतर आता आपण कार्यक्रमाकडे वळूया. कार्यक्रमाची सुरूवात एका मराठी चित्रपटानं झाली. चित्रपट दाखवायचं कारण असं की डेलावेयर मधील सर्व मराठी कुटुंबं एकत्र जमून समारंभाचा आनंद लुटायला आलेली असतात. सगळ्यांनी जमून आनंद घेता येईल अशासाठी चित्रपटासारखं दुसरं माध्यम कुठलं? मंडळाकडे चित्रपट दाखवायचं सर्व साहित्य स्वतःकडे उपलब्ध असल्यानं चित्रपट दाखवण्यात कोणतीही अडचण आली नाही. ह्या चित्रपटाचा आनंद सगळ्यांनी मनसोक्त लुटला.

चित्रपटाच्या मध्यंतरामधे थोडासा औपचारिक कार्यक्रम आणि अल्पोपहार असा कार्यक्रम होता. संक्रांत हा दरवर्षीचा पहिला कार्यक्रम असल्यानं या वेळी मंडळाची जुनी कार्यकारिणी समिती मंडळाचा कार्यभाग नव्या कार्यकारिणीकडे सोपवते. हा कार्यक्रम मध्यंतरात पार पडला. मंडळाच्या नवीन अध्यक्षा अंजू साठ्ये केलार यांनी आधी संक्रांतीची थोडक्यात माहिती आणि यावर्षीची, म्हणजे 2006 ची कार्यकारिणी समिती जाहीर केली. कार्यकारिणीच्या सर्व सभासदांना मंचावर बोलावण्यात आलं, आणि प्रत्येकानं आपापली कार्यकारिणीमधली भूमिका आणि यावर्षीची उद्दिष्टं जाहीर केली.

डॉ. आश्लेषा चौघुले, ज्या आधी मंडळाच्या संकेतस्थळाचं काम बघायच्या, त्यांनी या वर्षी मंडळाच्या उपाध्यक्षपदाची जबाबदारी स्विकारली. मंडळाच्या सर्व कार्यक्रमांची व्यवस्था आणि अध्यक्ष, ख़जिनदार आणि सचिव यांबरोबर प्रत्येक कार्यक्रमामधे सहभाग अशी त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली.

मंडळाचा सचिव आणि विद्यार्थी प्रतिनिधी या नात्यानं आशय जावडेकर यानं त्याची भूमिका स्पष्ट केली. कार्य कारिणीच्या बैठका नियोजित करणे आणि प्रत्येक बैठकीच्या नोंदी ठेवणे, तसंच मंडळाच्या सर्व कार्यक्रमांची छायाचित्रं, व्हिडीओ काढणे आणि प्रत्येक कार्यक्रमाचा अहवाल तयार करणे अशी त्यानं आपल्या कार्याची रूपरेषा सांगितली.

ख़जिनदार पदाची जबाबदारी स्विकारलेल्या मुकुंद जोशींनी त्यांची भूमिका स्पष्ट केली. 'ख़रं तर प्रत्येक कार्यक्रमाचा ख़जिना म्हणजे मंडळाच्या कार्यक्रमाला लाभलेला उदंड प्रतिसाद हाच आहे', असं ते म्हणाले. DVMMM चा सर्व आर्थिक निधी आणि त्याचा हिशेब याची जबाबदारी मुकुंद जोशींवर आहे.

मध्ये एक वर्ष खंडित झालेल्या परंतु यावर्षी परत स्थापन झालेल्या अन्नपूर्णा या पदाविषयी माहिती देताना विजया एडेकर शाह म्हणाल्या, "मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमात सर्वांना खायच्या गोष्टींविषयी खूप उत्सुकता असते. सर्वांना योग्य प्रमाणात खायला मिळावं आणि अन्न योग्य दरात योग्य विक्रेत्याकडून खरेदी करायची जबाबदारी माझ्यावर आहे." DVMMM चं हे एक महत्त्वाचं पद ठरणार आहे हे निश्चित !

मंडळाचा सांस्कृतिक सचिव समर्थ जोशी, मंडळाच्या संकेतस्थळाचं काम बघणारे श्रीराम देशपांडे आणि कार्यकर्ता संदीप करोडे हे या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्या वतीनं अंजू साठये केलार यांनी भाषण केलं.

यानंतर मंडळाच्या मावळत्या अध्यक्षा शैला वैद्य आणि मावळते सांस्कृतिक सचिव शिरीष जुनागडे यांचा एक छोटीशी भेट देऊन सत्कार करण्यात आला. दोघांनीही नव्या कार्यकारिणीला त्यांच्या कामासाठी शुभेच्छा दिल्या.

या वर्षीच्या संक्रांतीच्या कार्यक्रमासाठी फिलाडेल्फिया, वॉशिंग्टन डी.सी. आणि न्यू जर्सी येथील मराठी मंडळाच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांना DVMMM नं आमंत्रित केलं होतं. न्यू जर्सी आणि वॉशिंग्टन डी.सी. येथील अध्यक्ष आणि उपाध्यक्ष त्यांच्या संक्रांतीच्या कार्यक्रमात व्यस्त असल्यानं उपस्थित राहू शकले नाहीत पण फिलाडेल्फिया मंडळाच्या उपाध्यक्षा सुजाता देशमुख वेळात वेळ काढून आल्या. त्यांनी DVMMM च्या व्यवस्थापनाचं कौतुक केलं आणि डेलावेयर आणि फिलाडेल्फिया, दोन्ही मंडळांनी एकत्र काम करण्यास आणि एकत्र कार्यक्रम आयोजित करण्यास प्रोत्साहन दिलं. त्यांचाही एक छोटीशी सप्रेम भेट देऊन सत्कार करण्यात आला.

तीळ गूळ, हलवा यांची देवाणघेवाण, गप्पा, अल्पोपहार यात मध्यंतराची पंधरा मिनीटं निघून गेली आणि परत उरलेल्या चित्रपटाचा आनंद सर्व सभासदांनी लुटला.

चित्रपटानंतर रात्रीचं एकत्र जेवण आयोजित करण्यात आलं होतं. गूळपोळी, मसालेभात, मठ्ठा, पापड, मिरगुंड, लोणचं असा भरगच्च बेत जेवणासाठी होता. DVMMM च्या सदस्यांनी स्वखुशीनं पुढं येऊन हे पदार्थ बनवले होते. त्यामुळं जेवणाला अगदी घरची चव आली होती. सर्व जोडपी, त्यांची मुलं, काही विद्यार्थी यांनी अगदी मनसोक्त जेवणाचा आनंद उपभोगला. खूप गप्पांचे फड रंगले. लहान मुलांना आधी जेवण देण्यात आलं. त्यांची छोटीशी पंगत भारी मजेदार दिसत होती. अन्नपूर्णा पदाची चोख जबाबदारी विजया येडेकर शाह यांनी पार पाडली. डॉ. आश्लेषा चौघुले आणि विजया एडेकर शाह अगदी जातीनं जेवणाच्या टेबलापाशी उभं राहून कुणाला काय हवं नको ते पहात होत्या.

जेवणानंतर सर्व मंडळी एकमेकांचा निरोप घेऊन आपापल्या घरी जायला निघाली. सर्वांनी पाच सहा तास अगदी आनंदात एकमेकांबरोबर घालवले होते, आणि याचं समाधान, याचा आनंद प्रत्येकाच्या चेहÚयावर दिसत होता. हे समाधानच 2006 सालच्या नव्या कार्यकारिणीच्या यशाची पावती होती आणि असा रितीनं संक्रांतीचा सोहळा यशस्वीरित्या पार पडला. असेच पुढचेही कार्यक्रम आनंदात आणि उत्साहात पार पडोत हीच देवाकडे प्रार्थना!

*आशय दिलीप जावडेकर*
*सचिव*
*DVMMM*